जगभर

इबोला – नवे आव्हान

चंद्रशेखर पुरंदरे

मागच्या वर्षी ६ डिसेंबरला दोन वर्षांचा एक मुलगा पूर्व आफ्रिकेतील एका देशात मरण पावला. आठवड्याभरात त्याचा तीन वर्षांचा भाऊ, आई आणि आजीही गेली. आजीच्या अंत्यसंस्काराला आलेल्या लोकांपैकी दोघांना रोगाची लागण झाली. त्यांनी ती त्यांच्या खेड्यात पोचवली. त्यांच्यावर उपचार करणारा एक आरोग्यसेवक व त्यांचा डॉक्टर यांना हाच रोग लागून ते दगावले. त्या दोघांनी इतर अनेकांपर्यंत विकार पोचवला. ही साखळी वाढत राहिली आणि वाढते आहे.

हा इबोला व्हायरस. त्याने होणारा रोगही त्याच नावाने ओळखला जातो. तो जीवघेणा आहे कारण त्यावर औषध नाही. हे लक्षात येईपर्यंत या वर्षीचा मार्च उजाडला. तोपर्यंत पूर्व आफ्रिकेतील काही देशांत - आधी गायना, जिथे तो मुलगा होता, मग सिएरा लोन व लायबेरिया हे शेजारी देश आणि अलिकडे नायजेरिया या देशात हे लोण पसरत आहे. आजवर २००० च्या आसपास लोकांचे निदान झाले आहे आणि हजाराहून अधिक मरण पावले आहेत, हे अनुमान आहे. प्रत्यक्षदर्शींच्या मते खरी संख्या खूप जास्त आहे. मरणही त्वरित येत नाही. मूत्रपिंड, यकृत निकामी होते, उलट्या, अतिसार होणे व शेवटी शरीराबाहेर व अंतर्गत प्रचंड रक्तस्राव होणे, अशा टप्प्यात येते.

इबोला व्हायरस माकडे व एका प्रकारची वटवाघळे यांच्यामार्फत माणसांपर्यंत पोचतो. नंतर तो संसर्गजन्य होतो व रोगी त्याच्या सान्निध्यात किंवा संपर्कात येणाऱ्या माणसांपर्यंत नेतो. नायजेरिया सोडता इतर देशांच्या सीमा संलग्न आहेत व माणसांची ये-जा सीमापार होत असते. त्यामुळे त्या तीन देशांत रोगाचा प्रादुर्भाव त्वरित झाला. हे देश आफ्रिकेतील अगदी गरीब देशांपैकी आहेत.

या रोगावर इलाज तर नाही पण रोग्याला जंतुविरहित वातावरणात तातडीने हलवणे, त्याचा संपर्क ज्या लोकांशी अलिकडे आला, त्यांच्यावर देखरेख ठेवणे, त्यांच्या तपासण्या करणे एवढेच आजमितीला शक्य आहे. त्यामुळे निदान संसर्ग तरी वाढणार नाही. पण एकीकडे हा खर्चिक कार्यक्रम आहे. दुसरीकडे त्याला लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ म्हणजे डॉक्टर्स, नर्सेस, इतर आरोग्यसेवक, समाजसेवक उपलब्ध नाहीत. त्यात भर म्हणून तेथील सामाजिक वातावरणही अनुकूल नाही. लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, सरकारवरील अविश्वास, परकीयांवरील संशय असे अनेक घटक नियंत्रण अवघड करत आहेत. डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स नावाची एकमेव स्वयंसेवी संघटना पहिल्यापासून तेथे हजर आहे. त्यांनी उपचारकेंद्रे उभारली. पण ते देत असलेल्या उपचारांनी व औषधांनीच हा रोग होत आहे असा प्रचार सुरू झाला. मग एका प्रकारच्या मंतरलेल्या मीठाचे पाणी प्याल्यास हा रोग होत नाही किंवा बरा होतो ही एक अंधश्रद्धा तेथे प्रचलित झाली. सरकारच रोग फैलावण्यासाठी परकीय संस्थांना सामील आहे हा आणखी एक समज. या वातावरणात रोग नियंत्रण अवघड होते. १८ ऑगस्टला अशा एका उपचारकेंद्रावर काही सशस्त्र लोकांनी हल्ला केला. ही घटना लायबेरिया या रोगग्रस्त देशाच्या मन्रोविया या राजधानीत घडली. हल्लेखोरांच्या मते लायबेरियात इबोला नाहीच. त्यांनी हे उपचारकेंद्र लुटले, वैद्यकीय कर्मचाऱ्यांना धमकावण्या देऊन सुमारे ३० पेशंटस्ची 'मुक्तता' केली. हे पेशंटस् परागंदा झाले आहेत. नंतर त्यातले १७ सापडले. उरलेले तो रोग पसरवणार हे उघड आहे.

सरकारचे धोरण तर आणखीच भयावह आहे. एखाद्या वस्ती किंवा खेड्यात रोगी आढळला तर ती वस्ती किंवा खेडेच बहिष्कृत करण्यात येते. तिथे वैद्यकीय मदत पोचवण्याऐवजी त्यांच्याशी बृहत्जगाचा संबंधच तोडण्यात येतो. म्हणजे, जे इबोलाला बळी पडणार नाहीत, ते उपासमारीला बळी पडण्याची शक्यता निर्माण होते. अशा ठिकाणी आता आंतरराष्ट्रीय संघटना अन्नाची पाकिटे विमानाने पाठवत आहेत. या सरकारी धोरणाचे पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर दिसण्याला सुरूवात झाली आहे. या देशातून येणाऱ्या प्रवाशांवर अनेक देशांनी आपल्या देशात यायला बंदी घातली आहे.

त्यात वर्णभेदाचीही भर आहे. या प्रदेशात दोन गोरे अमेरिकन डॉक्टर काम करत होते. त्यांना लागण झाल्याबरोबर अमेरिकेतील अद्ययावत हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले व अजून प्रायोगिक अवस्थेत असणारी औषधे सुरू करण्यात आली. त्याने ते आजवर तरी दगावलेले नाहीत. ही औषधे आफ्रिकेपर्यंत पोचलेली नाहीत. ती बनवणाऱ्या कंपनीकडे त्यांचा व्यावसायिक साठाही उपलब्ध नाही. जर ही औषधे परिणामकारक असतीलच, तर तसे उत्पादन व्हायला आणखी काही महिने जाणार.

दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने इबोला ही जागतिक आणीबाणी म्हणून जाहीर केले आहे. पण अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिकांवरच आहे.

Email-artnondeco@yahoo.co.uk
Website-www.art-non-deco.com